# बृहन्मुंबई महानगरपालिका

बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील अभियांत्रिकी विभागाच्या आस्थापनेवरील खालील तक्त्यात नमूद केलेली रिक्त पदे भरावयाची आहेत. त्यासाठीची निवड यादी बनविण्याकरिता खाली नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता व अटींची पूर्तता करत असून पात्र आहेत. उमेदवारांनी http://portal.mcgm.gov.in या वेबसाईटवरून ऑन लाईन अर्ज करावेत. अर्ज करण्यासाठी **उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा (valid) ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे** आणि भरती प्रक्रिया परिक्षेचे प्रवेशपत्र आणि इतर माहिती online देण्यात येणार असल्याकारणाने भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी वैध राहणे आवश्यक आहे.

**रिक्त पदांचा तपशिल -**

**दुय्यम अभियंता (स्थापत्य) - 'ब' वर्ग**
**एकूण पदे - 190 (वेतनश्रेणी - रु. 9300-34800 + ग्रेड पे रु. 4600 /- + अनुज्ञेय भत्ते)**

| **जात प्रवर्ग** | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | सा.व शै. मागास-वर्ग | एकूण मागास-वर्गीय | खुला | **एकूण पदे** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 23 | 26 | 7 | 4 | 2 | 3 | 19 | 3 | 30 | 117 | 73 | 190 |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.** | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 15 | 17 | 4 | 3 | 1 | 2 | 13 | 2 | 19 | 76 | 46 | 122 |
| अ)महिला(30%) | 7 | 8 | 2 | 1 | 1 | 1 | 5 | 1 | 9 | 35 | 22 | 57 |
| ब)खेळाडू( 5%) | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 6 | 4 | 10 |
| क) अनाथ मुले 1% | | | | | | | | | | | 1 | 1 |
| ड)नि:समर्थ (3%) | **श्रवण शक्तीतील दोष - 9 चलनवलन विषयक विकलांगता -6** याप्रमाणे नि:समर्थत्वाच्या प्रकारांनुसार कर्तव्य व जबाबदारीचा विचार करुन गुणवत्ता/उपलब्धतेनुसार | | | | | | | | | | | 15 |

**दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) - 'ब' वर्ग**
**एकूण पदे - 92 (वेतनश्रेणी - रु. 9300-34800 + ग्रेड पे रु. 4600 /- + अनुज्ञेय भत्ते)**

| **जात प्रवर्ग** | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | सा.व शै. मागास-वर्ग | एकूण मागास-वर्गीय | खुला | **एकूण पदे** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 10 | 6 | 1 | 1 | 2 | 1 | 20 | 3 | 15 | 59 | 33 | 92 |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.** | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 6 | 4 | 1 | 1 | 1 | 1 | 13 | 2 | 9 | 38 | 21 | 59 |
| अ)महिला(30%) | 3 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 6 | 1 | 5 | 18 | 10 | 28 |
| ब)खेळाडू( 5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 3 | 2 | 5 |
| क)नि:समर्थ (3%) | **श्रवण शक्तीतील दोष - 3 चलनवलन विषयक विकलांगता - 1** याप्रमाणे नि:समर्थत्वाच्या प्रकारांनुसार कर्तव्य व जबाबदारीचा विचार करुन गुणवत्ता/उपलब्धतेनुसार | | | | | | | | | | | 4 |

**दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ) 'ब' वर्ग**
**एकूण पदे - 9 (वेतनश्रेणी - रु. 9300-34800 + ग्रेड पे रु. 4600 /- + अनुज्ञेय भत्ते)**

| **जात प्रवर्ग** | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | सा.व शै. मागास-वर्ग | एकूण मागास-वर्गीय | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 5 | 4 | 9 |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.** | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 4 | 3 | 7 |
| अ)महिला (30%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 2 |
| ब)नि:समर्थ (3%) | **श्रवण शक्तीतील दोष / चलनवलन विषयक विकलांगता** याप्रमाणे नि:समर्थत्वाच्या प्रकारांनुसार कर्तव्य व जबाबदारीचा विचार करुन गुणवत्ता / उपलब्धतेनुसार - 1 | | | | | | | | | | | 1 |

www.nmk.co.in

**टिप**

- **भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.**
- **रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक / समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया कोणत्याही टप्यावर अंशतः / पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.**
- **समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे प्रक्रिया राबविली जाईल.**
- **नि:समर्थ उमेदवारांनी सदर पदाची कर्तव्ये, जबाबदारी, अपेक्षित शारिरीक क्षमता / पात्रता याबाबतची अपेक्षा दर्शविणारी माहिती वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या सदर जाहिरातीत पाहून त्याप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे.**
- **माजी सैनिकांना गट 'अ' व गट 'ब' मधील सेवेमध्ये वयोमर्यादा सवलत शासन निदेशानुसार प्रकरणपरत्वे लागू आहे.**
- **कोणत्याही उमेदवाराने एकाच पदासाठी एका पेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास त्यामधील अर्जाची फी भरल्याची विवरणे समान असल्यास फक्त शेवटची नोंदणी ग्राहय धरण्यात येईल व इतर नोंद झालेल्या अर्जाची फी जप्त करण्यात येईल. तसेच, ऑनलाईन परिक्षेस/मुलाखतीकरीता एकापेक्षा जास्तवेळा उपस्थित राहिल्यास उमेदवारी तात्काळ रद्द करण्यात येईल.**
- **नि:समर्थ व्यक्ती उपलब्ध न झाल्यास सदर पदे खुल्या प्रवर्गातील उपलब्ध पदांमधून रिक्त ठेवण्यात येतील.**
- **दि.15.11.2018 रोजी क्र.पी.आर.ओ./1398/ ए.डी.व्ही /18-19 या क्रमांकाअन्वये प्रसारित करण्यात आलेल्या दुय्यम अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी व विद्युत / वास्तुशास्त्रज्ञ ) या संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या पदांसाठी यापूर्वीच खुल्या प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना एसईबीसी या मागास प्रवर्गातून पुन:श्च अर्ज करण्याची मुभा देण्यात येत आहे. तसेच, इतर आरक्षण जसे अजा, अज, विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड), विमाप्र, इमाव प्रवर्गातून यापूर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तथापि, ज्या उमेदवारांनी उपरोक्त जाहिरातीअन्वये दिलेल्या मुदतीत अर्ज केलेला नसल्यास सर्व प्रवर्गातील उमेदवार नव्याने खालील नमूद कालावधीत अर्ज करू शकतात. खुल्या प्रवर्गातून अर्ज केलेल्या व रु.600/- एवढे परिक्षा शुल्क भरलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) उमेदवारांनी नव्याने रु.300/- परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.**

**II) समांतर आरक्षण -**

अ) शासन नियमाप्रमाणे महिलांसाठी 30% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात येईल. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ब) उपरोक्त रिक्त पदांपैकी शासन निर्णय क्रमांक. राक्रीधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि.01.07.2016 तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि.18.08.2016 आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार शासन मान्य क्रीडा प्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी 5% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

क) शासन नियमाप्रमाणे नि:समर्थ व्यक्तींसाठी 3% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

www.nmk.co.in

**III) वेतनश्रेणी -**

दुय्यम अभियंता (स्थापत्य /यांत्रिकी व विद्युत/ वास्तुशास्त्रज्ञ ) या तिन्ही पदांसाठी:
रु. 9300-34800 + ग्रेड पे रु. 4600 /- + अनुज्ञेय भत्ते.

**IV) विहीत अर्हता -**

**<u>पदनाम - दुय्यम अभियंता (स्थापत्य) पदाकरिताची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे:</u>**

**उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास: दि.20.01.2019**

1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य वा कन्स्ट्रक्शन अभियांत्रिकी मधील पदवी किंवा तिच्याशी समकक्ष अर्हता संपादित केली आहे.

**किंवा**

इंस्टिटयुशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत.

**किंवा**

असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी प्राप्त केली आहे.

**किंवा**

जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की (स्थापत्य) अभियांत्रिकीमधील परिक्षा देऊन ज्या संस्थेचे सभासदत्व इंस्टिटयुशन ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

2) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

3) उमेदवार ''डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.इ.सी.टी. चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्यावेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी. ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**पदनाम - दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पदाकरिताची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे:**

**उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास: दि.20.01.2019**

1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकी मधील पदवी / इलेक्ट्रॉनिक्स / प्रॉडक्शन अभियांत्रिकी मधील पदवी किंवा बॅचलर इन इंजिनीअरींग (इलेक्ट्रॉनिक्स ऍण्ड पॉवर इंजिनीअरींग) तिच्याशी समकक्ष अर्हता संपादित केली आहे.

**किंवा**

इंस्टिटयुशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची यांत्रिकी व विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत.

**किंवा**

असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या यांत्रिकी व विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील पदवी प्राप्त केली आहे.

**किंवा**

जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की (यांत्रिकी व विद्युत) किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील परिक्षा देऊन ज्या संस्थेचे सभासदत्व इंस्टिटयुशन ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

2) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

3) उमेदवार ''डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.इ.सी.टी. चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्यावेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी. ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

www.nmk.co.in

**पदनाम - दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ) पदाकरिताची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे:**

**उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास: दि.20.01.2019**

1) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची वास्तुशास्त्रातील पदवी प्राप्त केली आहे.

**किंवा**

जे रॉयल इंस्टिटयुशन ऑफ ब्रिटिश ऑर्किटेक्टस या संस्थेचे सहयोगी सभासद आहेत.

**किंवा**

ज्यांनी कलाभवन बडोदा या संस्थेची वास्तुशास्त्रातील पदवीका प्राप्त केली आहे.

**किंवा**

ज्यांनी महाराष्ट्र सरकारची [पुर्वीचे मुंबई सरकार] तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील शासकीय पदवीका प्राप्त केली आहे.

**किंवा**

ज्यांनी सर जे. जे. स्कूल ऑफ ऑर्किटेक्चर मुंबई या संस्थेच्या पाचव्या वर्षाच्या शाळा परीक्षेसह समकक्ष अर्हता प्राप्त केलेल्या आहेत.

**किंवा**

ज्यांनी ऑर्किटेक्टस ऍक्ट 1972 च्या कलम 35 [2] [1862 चा क्र. 20] अन्वये कौन्सिल ऑफ ऑर्किटेक्टस या संस्थेने रजिस्टर ऑफ ऑर्किटेक्टस मध्ये नोंदणीसाठी मान्य केलेल्या समकक्ष अर्हता प्राप्त केलेल्या आहेत.

2) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) उमेदवार ''डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' या स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.इ.सी.टी. चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्यावेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी. ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

टिप: १. i. संबंधित विद्यापीठ / संस्थेने पदवी / पदव्युत्तर पदवी प्रदान करताना विहित केलेले गुण विचारात घेण्यात येतील.

ii. ज्या उमेदवारांना पदवी / पदव्युत्तर पदवी प्रदान करताना विद्यापीठ / संस्था यांनी गुणपद्धतीऐवजी श्रेणी पद्धती वापरली आहे, त्यांच्या बाबतीत मिळालेल्या श्रेणीचे टक्केवारीमध्ये खालीलप्रमाणे रुपांतर करण्यात येईल. संबंधित विद्यापीठ / संस्था यांनी उमेदवारांच्या गुणपत्रिकेवर टक्केवारीत रुपांतर करण्यासाठी सूत्र दिले नसल्यास अशा उमेदवारांसाठी, **(नमूद केलेली श्रेणी – 0.75) X 10] हे सूत्र वापरून टक्केवारी काढण्यात येईल.**

२. **अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्था यांना संबंधित अभियांत्रिकी पदविका/पदवी अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे. अशा संस्थांमधून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचेच अर्ज ग्राह्य धरण्यात येतील.**
**मान्यताप्राप्त संस्थांविषयी माहिती पुढील संकेतस्थळावर पाहाता येईल** www.aicte-india.org; www.dte.org.in

३. दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ) पदाकरीता केंद्र सरकारने ऑर्किटेक्टस ऍक्ट 1972 च्या कलम 35 [2] अन्वये [1972 चा क्र. 20] प्रस्थापित केलेल्या कौन्सिल ऑफ ऑर्किटेक्चर तर्फे ठेवण्यात येणा-या रजिस्टर ऑफ ऑर्किटेक्चर मध्ये नाव नोंदविलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

## V) टक्केवारीची किमान मर्यादा -

| अर्हकारी परीक्षा | प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| **दुय्यम अभियंता (स्थापत्य), दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) व दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ)** | | |
| एस. एस. सी. | खुला | 50% |
| | सर्व मागासवर्गीय प्रवर्गांसाठी | 45% |
| एच. एस. सी. किंवा पदविका | खुला | 50% |
| | सर्व मागासवर्गीय प्रवर्गांसाठी | 45% |
| पदवी | खुला | 50% |
| | सर्व मागासवर्गीय प्रवर्गांसाठी | 45% |

www.nmk.co.in

## VI) वयोमर्यादा - (वरील सर्व पदांसाठी)

**उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास:दि.20.01.2019**

अ) उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत नसल्यास त्याचे वय दि. **20.01.2019** रोजी
ब) खुल्या प्रवर्गासाठी 18 ते 38 वर्षे दरम्यान,
क) मागास प्रवर्गासाठी 18 ते 43 वर्षे दरम्यान,
ड) शासन निदेशानुसार नि:समर्थ व्यक्तींसाठी 18 ते जास्तीत जास्त 45 वर्षे आणि
ई) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असल्यास उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा नाही.

## VII) निवडीचे निकष - (वरील सर्व पदांसाठी)

(i) सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेल्या अर्हता/अटी/शर्ती पूर्ण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची ऑन-लाइन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे बनविलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून विहीत सामाजिक तसेच समांतर आरक्षणाचा विचार करुन निवड यादी बनविण्यात येईल.

(ii) दुय्यम अभियंता या पदासाठी पात्र होण्याकरीता उमेदवारास ऑनलाइन परीक्षेत किमान 50% गुण मिळणे आवश्यक आहे.

(iii) दोन किंवा अधिक उमेदवारांचे गुण समान झाल्यास उमेदवारांच्या प्राधान्य क्रमाकरिता खाली दिलेले निकष क्रमवारीनुसार विचारात घेण्यात येतील.

अ) अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण केलेली उच्च शैक्षणिक अर्हता,
ब) उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक,
क) उमेदवारांच्या प्राधान्य क्रमाकरीता त्यांचे प्रथम पदवी व नंतर पदविका परिक्षेत प्राप्त गुण विचारात घेण्यात येतील,
ड) वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास, वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल,

उपरोक्त निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना राहातील.

ऑन लाईन परिक्षेमध्ये खालील वस्तुनिष्ठ प्रश्न-पद्धतीचा अंतर्भाव असेल.

| अ. क्र. | चाचणी | प्रश्नांची संख्या | गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | बौद्धिक क्षमता | 20 | 20 | 90 मिनिटे |
| 2 | सामान्य ज्ञान | 20 | 20 | |
| 3 | तांत्रिक ज्ञान | 60 | 60 | |

- सर्व चाचण्या इंग्रजी भाषेतून घेण्यात येतील. प्रत्येक प्रश्न एक मार्काचा असेल तसेच, प्रत्येक चूकीच्या उत्तरासाठी १/४ गुण वजा करण्यात येतील.

**VIII) <u>ऑन-लाईन अर्ज सादर करण्याची पद्धत -</u>**

1. दुय्यम अभियंता (स्थापत्य, यांत्रिकी /विद्युत, वास्तुशास्त्रज्ञ) पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा दि.11.01.2019 ते दि.20.01.2019 रोजी पर्यत अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकाच्या 23:59 वाजे पर्यत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील. ऑनलाईन अर्ज **दि.20.01.2019** रोजी पर्यतच स्विकारण्यात येतील.
2. उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेकरीता विहित केलेले शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.
3. उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा/अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडीवर ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तींसोबत देवाण-घेवाण करु नये. **<u>एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ईमेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.</u>**
4. ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पध्दतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर मिळणा-या ई-पावतीची (Transaction Successful झाल्यानंतर) प्रत त्वरीत मुद्रण करून (printout) स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे. ऑनलाईन परीक्षेच्यावेळी सदर ई-पावतीची छायांकित प्रत प्रवेशपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.
5. ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरिता "Click here for new Registration" हा टॅब निवडून त्यामध्ये नाव, संपर्काची माहिती व ई-मेल आयडी नमूद करावा. त्यानंतर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्क्रीनवर दिसेल. उमेदवाराने सदर तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्वत:कडे लिहून ठेवावा. तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड उमेदवारांना ई-मेल व एसएमएसद्वारे पाठविण्यात येईल. उमेदवाराला अर्जात काही दुरुस्ती करावयाची असल्यास तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डचा उपयोग करुन दुरुस्त्या करता येतील.
6. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज पूर्णपणे भरु शकला नाही तर भरलेली माहिती "SAVE AND NEXT" या टॅबचा वापर करुन SAVE करता येईल. ऑनलाईन अर्ज SUBMIT करण्यापूर्वी उमेदवाराने "SAVE AND NEXT" या सुविधेचा वापर करुन भरलेली माहिती तपासून पहावी व आवश्यकतेनुसार त्यामध्ये दुरुस्ती करावी. अंतिम SUBMIT करण्यापूर्वी सर्व माहिती योग्य रितीने भरली असल्याची खात्री करुन घ्यावी.
7. उमेदवाराने स्वत:चे/ वडिलांचे/ पतीचे नाव तसेच नावांचे स्पेलिंग योग्यरित्या भरणे आवश्यक आहे. सदरची माहिती योग्य पध्दतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
8. उमेदवाराने भरलेली माहिती तपासण्यासाठी व SAVE करण्यासाठी "Validate your details" आणि "SAVE AND NEXT" या बटनांचा वापर करावा.
9. ऑनलाईन अर्ज अंतिम SUBMIT करण्यापूर्वी ''Preview'' टॅबवर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा.
10. आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन, तसेच छायाचित्र व स्वाक्षरी योग्यरितीने अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन ''FINAL SUBMIT'' बटनवर क्लिक करावे.
11. ''Payment'' बटनावर क्लिक करुन परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे.
12. त्यानंतर ''SUBMIT'' बटनावर क्लिक करावे.
13. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक रितीने भरावी. तसेच विहित आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पध्दतीने भरल्यानंतरच ''SUBMIT'' बटन प्रेस करावे. एकदा ''SUBMIT''बटनावर क्लिक केल्यावर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने आवश्यक ती माहिती योग्य पध्दतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

www.nmk.co.in

14. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेने विहित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. तदनंतर केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

15. उमेदवाराने विहित मुदतीत ऑनलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. जेणेकरुन शेवटच्या क्षणी अडचण येणार नाही.

16. उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी व परीक्षेचे केंद्र इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

17. उमेदवाराचा रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड योग्य पध्दतीने रजिस्टर्ड झाल्यानंतर त्याच्या ई-मेलआयडी/भ्रमणध्वनी क्रमांकावर संदेश पाठविण्यात येईल. जर उमेदवाराला ई-मेल किंवा एसएमएसद्वारे सूचना मिळाली नाही तर त्याचा अर्ज योग्य पध्दतीने रजिस्टर्ड झाला नाही असे समजावे.

18. अपूर्ण अर्ज उदा. छायाचित्र आणि स्वाक्षरी इत्यादी नसलेले अवैध ठरविण्यात येतील.

19. वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

20. उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर/ उपस्थिती पत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी.

21. उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

22. **रजिस्ट्रेशन व परीक्षा शुल्क पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने संपूर्ण अर्जाची मुद्रण करून (printout) स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.** ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वत: जबाबदार राहील त्यास बृहन्मुंबई महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

## ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पध्दत

1. ऑनलाईन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह (Payment Gateway) एकत्रित करुन उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

   **परिक्षा शुल्क:**

   **खुल्या प्रवर्गातील उमेदवार : रु. 600/-**

   **मागास/इतर मागासप्रवर्गातील उमेदवार : रु. 300/-**

2. परीक्षा शुल्क इंटरनेट बँकिंग किंवा क्रेडीट कार्ड किंवा डेबिट कार्ड (RuPay/Visa/MasterCard/Maestro) किंवा IMPS किंवा कॅश कार्डस किंवा Mobile Wallets द्वारे भरता येईल.
3. ऑनलाईन परीक्षा शुल्काचे Submission केल्यानंतर थोडा वेळ वाट पाहणे आवश्यक आहे. सदर कालावधीत कोणत्याही परिस्थितीत Back किंवा Refresh बटन दाबु नये.
4. ऑनलाईन शुल्क भरणा यशस्वी झाल्यानंतर ई-पावती (E-Receipt) तयार होईल. ई-पावती तयार न होणे हे परीक्षा शुल्क भरले गेले नाही असे दर्शविते.
5. उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे यशस्वी न झाल्यास (Payment Failure) तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डच्या आधारे पुन्हा लॉगीन करावे लागेल. उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा यशस्वी न झाल्यास your online Transaction was unsuccessful please register again असा संदेश दिसेल. अशावेळी उमेदवाराने ऑनलाईन लिंकवर जाऊन पुन:श्च लॉगीन करणे आवश्यक आहे.
6. नोंदणी यशस्वी झाल्यानंतर उमेदवारास ई-पावती (E-Receipt) मिळेल. सदर ई-पावती व ऑनलाईन अर्जाची मुद्रण करून (printout) काढुन ठेवणे आवश्यक आहे. ई-पावती उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबत सादर करावी.
7. Credit Card द्वारे परीक्षा शुल्क भरताना भारतीय चलनाचीच नोंद करावी.
8. आपले रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यानंतर ब्राऊजर विंडो बंद करण्याची दक्षता घ्यावी.
9. उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

www.nmk.co.in

## छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याच्या सूचना

**छायाचित्र:-**

1. उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र अपलोड करावे.
2. सदरचे छायाचित्र फिकट, रंगीत किंवा पांढ-या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे.
3. कॅमे-याकडे शांतपणे व स्थिर नजरेने पाहावे. सूर्यप्रकाशात जर छायाचित्र काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी. फ्लॅशचा वापर केल्यास Red Eye येणार नाही याची दक्षता घ्यावी.
4. चष्मा वापरत असल्यास तुमचे डोळे दिसतील अशा प्रकारचे छायाचित्र असावे. छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये. जेणेकरुन चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
5. छायाचित्र 200x230 pixels एवढे असावे व त्याचा आकार 20kb ते 50kb इतका असावा. स्कॅन केलेले छायाचित्र हे 50 kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी.

**स्वाक्षरी:-**

1. उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढ-या कागदावर स्वाक्षरी करावी.
2. सदरची स्वाक्षरी ही उमेदवाराचीच असावी. सदरची स्वाक्षरी ही प्रवेशपत्रावर ज्या ठिकाणी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करण्यात यावी.
3. अर्जासोबत अपलोड केलेली स्वाक्षरी व उपस्थिती पत्रावरील स्वाक्षरी भिन्न असेल तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
4. स्वाक्षरीचा आकार 10kb ते 20kb व त्याचे Dimensions 140x160 pixels एवढे असावे. स्वाक्षरीची स्कॅन केलेली ईमेज ही 20kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी.

**छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याची पध्दत.**

1. छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे. त्यासाठी स्कॅनरचे Resolution हे 200 डी.पी.आय. (Dots per inch) एवढे असावे.
2. कलर हा True colour व फाईलची साईज ही उपरोक्त प्रमाणे सेट करण्यात यावी.
3. उपरोक्त छायाचित्र व स्वाक्षरीबाबत दिलेल्या सूचनेनुसार छायाचित्र असणे आवश्यक आहे. त्याची फाईल ही JPG OR JPEG Format मध्ये असावी.
4. जर मुद्दा क्र.3 नुसार छायाचित्र व स्वाक्षरी नसेल तर स्क्रीनवर Error Message दिसेल.

**छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची पध्दत.**

1. छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी Upload Photograph व Upload Signature या दोन स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. उमेदवाराने योग्य त्या लिंकवर क्लिक करावे व त्यानंतर छायाचित्र / स्वाक्षरी असलेली फाईल Select करावी व Upload बटनावर क्लिक करावे.
2. उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी ही उपरोक्त पध्दत अवलंबिल्याशिवाय Upload होणार नाही याची नोंद घ्यावी.
3. उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

**परीक्षेचे केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना**

**केंद्र**

1. परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल.
2. परीक्षेचे केंद्र / स्थळ / दिनांक / वेळ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.
3. बृहन्मुंबई महानगरपालिका कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि/ किंवा परीक्षा केंद्र वाढवणे याचे अधिकार राखून ठेवत आहे.
4. बृहन्मुंबई महानगरपालिका, उमेदवाराने मागितलेल्या परीक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार राखून ठेवत आहे.
5. उमेदवार परीक्षा स्थळावर त्याच्या / तिच्या स्वत:च्या जबाबदारी व स्वत:च्या खर्चाने परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा देईल आणि यासाठी उमेदवारांस कोणत्याही प्रकारची दुखापत किंवा नुकसान झाल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही.

**प्रवेशपत्र डाउनलोड करणे**

ऑनलाईन परिक्षेसाठी प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता उमेदवारांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वेबसाईटवर भेट द्यावी. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने संबंधित Link वर Click केल्यानंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीताची window स्क्रीनवर दिसेल. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता उमेदवाराने रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड/जन्मतारखेचा वापर करावा. उमेदवाराने प्रवेशपत्रावर रजिस्ट्रेशन करताना वापरलेले अलिकडच्या काळातील छायाचित्र चिकटवावे.

**ओळख पटवणे**

i) परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / फोटोसहीत आधारकार्ड / बँकेचे फोटोसहीतचे पासबुक / महाविद्यालयाचे / विद्यापिठाचे अलिकडील वैध ओळखपत्र / कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहीत असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

टिप :- उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहतांना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नांव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या

www.nmk.co.in

महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावांत विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र/ विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ प्रतिज्ञापत्र (Affidavit) यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नांवात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. **रेशन कार्ड व ई-Adhar कार्ड परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.**

सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

1. परीक्षेसाठीचे वैध प्रवेशपत्र
2. मूळ फोटो ओळखपत्र
3. फोटो ओळखपत्राची छायांकित प्रत

ii) **परीक्षेला उशिरा येण्याबाबत:-** परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दिड तास असली तरी उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, परीक्षेसाठी लॉग इन करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण एक तास अगोदर परीक्षा स्थळावर उपस्थित राहावे लागेल.

**निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक /अनुचित प्रकार/गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करावयाची कार्यवाही:-**

उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरतांना दडवून ठेवू नये.

**परीक्षेच्या वेळात किंवा एकूणच निवड प्रक्रीयेदरम्यान जर उमेदवार,**

1. अनुचित प्रकार करणे किंवा
2. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा
3. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, उद्धृत करणे, पाठवणे, साठवणे किंवा करणे किंवा
4. स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पद्धतीचा अवलंब करणे किंवा
5. स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा
6. दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे.

**अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास गुन्हेगारी कार्यवाहीस सामोरे जाण्यासह सदर उमेदवारास**

1. तो ज्या परीक्षेला बसणार आहे त्या परीक्षेसाठी त्या उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.
2. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.
3. जर उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

**इतर महत्वाच्या सुचना:**

1. परीक्षा घेतांना काही अडचणी उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यामुळे परीक्षा देण्यावर आणि / किंवा परीक्षेचा निकाल तयार होण्यावर परिणाम होऊ शकेल. अशा प्रसंगी उमेदवारांना परीक्षेसाठी इतर केंद्रावर हलविणे किंवा परीक्षा घेणे यासारखे आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील. ज्या उमेदवारांना अशा प्रकारचा बदल मंजूर नसेल त्या उमेदवारांची उमेदवारी या परीक्षेपुरती रद्द करण्यात येईल.
2. या भरती प्रक्रीयेअंतर्गत उद्भवणाऱ्या सर्व बाबींसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल व तो उमेदवारांना बंधनकारक असेल. यासंबंधात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा व्यक्तिगत विचारणांना उत्तर दिले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
3. एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घेतली गेल्यास वेगवेगळ्या सत्रांमधील वापरलेल्या टेस्ट बॅटरीजच्या काठिण्यपातळीत थोडासा फरक असल्यामुळे हा फरक जुळवून घेण्यासाठी मिळालेले गुण समिकृत केले जातील.
4. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.
5. शासनाने विविध शासन निर्णयानुसार वेळोवेळी निर्गमित केलेल्या विविध सवलती, अटी, शर्ती सदर भरती प्रकियेसाठी लागू राहतील व त्याचे पालन करण्यात येईल.
6. निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.
7. उमेदवाराने सदर पदाच्या अर्हता/अटींनुसार तो सदर पदासाठी पात्र असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.
8. **सदर नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड याचा उपयोग करून उमेदवाराला भरलेल्या अर्जाची प्रत (print out) online प्राप्त करता येईल. सदर अर्ज उमेदवाराने स्वत:जवळ ठेवावा.** पोस्टाने किंवा कुरिअरने पाठवू नये. परिक्षेअंती निवडलेल्या उमेदवारांनी सदर अर्ज, त्यावर स्वत:चा पासपोर्ट आकाराचा अलिकडे काढलेला फोटो चिकटवून

www.nmk.co.in

अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी, सर्वसाधारण अटी क्र. 6 मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह, नियुक्तीपूर्व सादर करणे आवश्यक आहे.

9. परिक्षेचे विहीत शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने ताबडतोब ऑन-लाइन अर्ज सादर करावा. शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने अर्ज केला नाही तर शुल्क परत देण्याबाबतची उमेदवाराची कोणतीही विनंती मान्य करण्यात येणार नाही.

10. इतर कोणत्याही पद्धतीने उदाहरणार्थ पोस्टाने/कुरिअरने पाठविलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत.

11. अर्जानुसार पात्र असलेल्या उमेदवारांना परिक्षेसाठी प्रवेश पत्र पोस्टाने किंवा कुरिअरने पाठविण्यात येणार नाही. उमेदवाराने नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड वापरून प्रवेशपत्र डाऊनलोड करून घ्यावे आणि त्याची प्रत (print out) काढावी.

12. उमेदवाराने प्रवेश पत्रावर स्वत:चे अलिकडे काढलेले रंगीत छायाचित्र चिकटविणे आणि परिक्षेच्या वेळेस ते सादर करणे आवश्यक आहे.

13. ऑन-लाइन परीक्षा बृहन्मुंबईमध्ये/ठाणे जिल्ह्यात घेण्यात येईल. तथापी आवश्यकतेप्रमाणे परीक्षा स्थळांमध्ये वाढ/बदल करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राहातील.

14. उमेदवारांना परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

15. परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

## IX) नोंदणी व परिक्षेबाबतचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| ऑन-लाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | : | दि.11.01.2019 ते दि.20.01.2019 |
| नेट बॅकिंगद्वारे अर्ज शुल्क जमा करण्याचा कालावधी | : | दि.11.01.2019 ते दि.20.01.2019 |
| ऑन-लाईन परिक्षा | : | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल |

**(वरील दिनांकात बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना रहातील.)**

www.nmk.co.in

## X) सर्वसाधारण अटी -

1) जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येएवढी निवड यादी बनविण्यात येईल. तथापि, तयार करण्यात आलेली निवडयादी कोणत्याही वेळेस पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अथवा वाढविण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत. यास्तव उमेदवाराचे नाव निवड यादीत समाविष्ट झाले तरीही सदर पदावर त्याचा, नियुक्तीसाठी कोणताही अधिकार रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

2) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष यात बदल होऊ शकतो. यास्तव, प्रत्येक पदाच्या बदल झालेल्या रिक्त पदानुसार गुणवत्ता यादीतून उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडे रहातील.

3) तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत; या दोन्हीपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राहय असेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. तथापी, सदर विधीग्राहय कालावधी मध्ये बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांकडे रहातील.

4) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला भरतीकरिता यावयाचे असेल तर त्याने/तिने त्याच्या/तिच्या खाते प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र ऑन-लाइन अर्ज सादर करण्यापूर्वी अथवा प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

5) उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन-कोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.

6) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरिता विचार केला जाणार नाही.

7) उमेदवांराने नियुक्तीपूर्वी खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रे/कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्याच्या छायांकित प्रती तपासणीसाठी नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करणे आवश्यक आहे.

ए) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मदाखला/अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),

बी) माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.)व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (एच.एस.सी.) यांच्या गुणपत्रिका व उत्तीर्ण झाल्याची प्रमाणपत्रे, गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे,

सी) पदवी/पदविका परीक्षेच्या सर्व सत्र/वर्षाच्या गुणपत्रिका, उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे. तथापि पदवी/पदविका परीक्षेची मूळ गुणपत्रिका पुढील अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अथवा महाविद्यालय यांच्याकडे सुपूर्द केली असल्यास त्याबाबतचे संबंधित विद्यापीठ/महाविद्यालय यांच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र व त्यांनीच साक्षांकित केलेली पदवी/पदविका परीक्षेची छायांकित गुणपत्रिका आणणे आवश्यक आहे,

डी) एस. एस .सी., एच. एस. सी. व पदवी/पदविका किंवा तत्सम परिक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नांत उत्तीर्ण झालेले असल्यास प्रत्येक प्रयत्नांची गुणपत्रिका व एकूण प्रयत्नांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे,

ई) डी. ओ. ई. ए. सी. सी. सोसायटीचे सी. सी. सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर या स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम. एस. सी. आय. टी. किंवा जी. ई. सी. टी.चे प्रमाणपत्र किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेले प्रमाणपत्र.

एफ) सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे अलीकडील प्रमाणपत्र (latest Non Creamy-layer Certificate) नियुक्ती पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांकडे नियुक्तीच्या वेळी जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्र.क्र.1064/2011/16बी दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेला संबधित उमेदवार नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकेल. मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्ती झाली असल्यास जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून त्यास तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. तथापी, नियुक्तीनंतर एक महिन्याच्या आत उमेदवारांने संबधित पडताळणी समितीकडे दावा दाखल करून त्याबाबतची पोहोचपावती नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक आहे. मागासवर्गीय कर्मचा-याने जात पडताळणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर करून संबंधित पडताळणी समितीकडून त्याची पोचपावती सादर न केल्यास, तसेच त्यांनी सादर केलेले ''जात प्रमाणपत्र'' संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविल्याचे कळविण्यात आल्यास त्याक्षणी त्यांना कोणतीही सूचना न देता / त्यांच्याविरुध्द कोणतीही खात्यांतर्गत चौकशीची कारवाई न करता त्यांचे नियुक्तीचे आदेश त्वरित रद्द करण्यात येतील.

जी) उमेदवार सरकारी, निम-सरकारी किंवा खाजगी नोकरीत असल्यास नियोक्त्याचे (Employer) ना-हरकत प्रमाणपत्र,

एच) विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र/नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करणे आवश्यक आहे, (लग्नापूर्वीच्या नावाने सुध्दा अर्ज करु शकतात.)

आय) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नावनोंदणी केली असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र (Employment exchange card),

जे) अ.जा. आणि अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता इतर सर्व मागास तसेच खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणारे स्त्री उमेदवार यांच्याबाबतीत ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेले नवीनतम (latest Non Creamy-layer Certificate) प्रमाणपत्र, नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

के) नि:समर्थ उमेदवाराच्या बाबतीत किमान 40 टक्के नि:समर्थत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.

एल) खुल्या वर्गातील महिला व अन्य समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोणातून शासकीय निदेशानुसार सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायांप्रती नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

एम 1) खेळाडूंनी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि.01.07.2016 तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि.18.08.2016 आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**एम २) प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत त्यांची क्रीडा विषयक प्रमाणपत्रे योग्य दर्जाची असल्याबाबत व खेळाडू प्रवर्गातील आरक्षित पदासाठी तो/ती पात्र ठरतो/ठरते याबाबत, सदर पदासाठी अर्ज सादर करण्यापूर्वीच, सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.**

एम ३) संचालक, क्रीडा व युवक संचालनालय किंवा सक्षम प्राधिका-याकडे प्रमाणपत्रे सादर करताना पात्र खेळाडू उमेदवाराने प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासाठी त्यांना पात्र ठरवणारी आपली खेळाडू विषयक सर्व प्रमाणपत्रे एकाच वेळी सादर करणे आवश्यक आहे.

एम ४) क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याविषयी अर्ज सादर करण्यापूर्वीच्या दिनांकाचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर केले तरच त्यांना खेळाडू प्रवर्गाच्या आरक्षणाचा लाभ घेता येईल.

8) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यामध्ये शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवारांविरुद्ध पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

9) निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी उमेदवाराला सदर पदाच्या एक महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल किंवा तशा आशयाचे बंधपत्र (Bond) सादर करावे लागेल. सदर भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारास बिनव्याजी परत मिळेल.

www.nmk.co.in

उमेदवाराने सुरक्षा अनामत रक्कम भरुनसुद्धा मनपामध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना, त्यांनी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क राहाणार नाही.

10) निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार पाळ्यांमध्येही (Shift duties) काम करावे लागेल.

11) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याला सेवेतून कमी करण्यात येईल.

12) उमेदवाराने परिक्षा हॉलमध्ये गैरवर्तणूक केली तर त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

13) निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्त्वावर नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, 1999 लागू होतील. तसेच शासन निर्णय क्र. अंनियो/1005/126/सेवा-4 दि. 31.10.2005 अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल.

14) सदर भरती-अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी (नैमित्तिक रजा सोडून अन्य कोणत्याही रजेचा/अनुपस्थितीचा कालावधी वगळून) असेल व तीन वर्षांनंतरचे सेवा-सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

15) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

16) शासन निर्णय क्र. संकिर्ण/2007/पडताळणी/नवि-26 दि.21.11.2007 अन्वये, निवड झालेल्या उमेदवारांविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य-प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची/तिची सदर पदावर नेमणूक केली जाईल. तसेच शासन परि क्र.याचिका-3013/प्र.क्र.120 नवि मंत्रालय दि.19.11.2014 मध्ये दिलेल्या निदेशानुसार निवड झालेल्या उमेदवाराने संबंधित पोलिस स्टेशन कडून चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर नियुक्ती देण्यात येईल.

17) नि:समर्थ व्यक्तींसाठी आरक्षित पदावर अर्ज करणा-या उमेदवाराने किमान 40% नि:समर्थत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या नि:समर्थ उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने शारिरीकदृष्टया पात्र ठरविल्या नंतरच त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

18) नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांना लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, उमेदवाराने ऑन-लाईन अर्ज भरताना याबाबत त्याची माहिती नमूद करणे आवश्यक आहे.

19) नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांना परिक्षेकरीता प्रति एक तासासाठी 20 मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात येईल.

20) नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांनी परिक्षेपूर्वी व परिक्षेवेळी प्रपत्र-1, प्रपत्र-2, विवरणपत्र-3, विवरणपत्र-4 आवश्यकतेनुसार भरुन सादर करावे.

| | |
|---|---|
| प्रपत्र-1 | नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्तीसाठी लेखनिक व / किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज. |
| प्रपत्र-2 | Certificate of Disability in Dominant (Writing) Extermity. |
| विवरणपत्र-3 | लेखनिकाची मदत घेणा-या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे संयुक्त प्रमाणपत्र. |
| विवरणपत्र-4 | अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) मागणी करणा-या उमेदवाराने द्यावयचे प्रमाणपत्र. |

21) शासन निदेशानुसार, नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांना त्यांची कर्तव्ये / जबाबदा-या पार पाडण्यासाठी आवश्यक असणारे सहायक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देण्यात येतील.

22) उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

23) उमेदवारांना परीक्षेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

24) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

25) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

26) नि:समर्थ उमेदवारांनी सोबत जोडलेल्या तक्त्यामधील दुय्यम अभियंता (स्थापत्य, यां./ वि., वास्तुशास्त्रज्ञ) पदाची कर्तव्ये, जबाबदारी व त्यासाठी आवश्यक ती शारीरीक क्षमता/पात्रता यांची नोंद घ्यावी.'

27) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

www.nmk.co.in

28) काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

29) उमेदवाराने या भरतीप्रक्रिये संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया वरील वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

30) निवड प्रक्रियेत कोणत्याही स्तरावर निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना रहातील.

31) बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ असल्याचे प्रमाणपत्र असणा-या मुलांसाठीच हे आरक्षण लागू राहिल. निवड झाल्यानंतर पडताळणीप्रसंगी अनाथ आरक्षणांतर्गत मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच, अनाथ आरक्षणाकरीता सादर केलेल्या प्रमाणपत्राची फेरतपासणी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्यामार्फत नियुक्तीपूर्वी करुन घेण्यात येईल.

32) **सामाजिक व शैक्षणिक मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णय क्र.बीसीसी/2018/प्र.क्र.581 ए/2018/16-ब दि.05.12.2018 तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक बीसीसी/2018/प्र.क्र.581 ए/2018/16-ब दि.19.12.2018 अन्वये एसईबीसी आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांकडे सद्यःस्थितीत जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध नसण्याची शक्यता विचारात घेता, त्यांना जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राशिवाय सध्या अर्ज करता येईल. तथापि, सदर उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीच्या वेळी जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. एसईबीसी आरक्षणाअंतर्गत निवडीबाबतचा निर्णय न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेतील अंतिम आदेशाच्या अनुषंगाने प्राप्त शासन निर्देशानुसार राहील.**

33) खेळाडू उमेदवारांकरीताच्या अटी व मार्गदर्शक तत्वे-

1. खेळाडू हा महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवासी असावा व त्याला मराठीचे ज्ञान असावे.
2. सदर खेळाडू संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदासाठी आवश्यक असणारी किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त करणारा असावा.
3. खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणातून सरळसेवेने नेमलेला उमेदवार हा आरक्षण बिंदू नामावलीमध्ये त्या त्या प्रवर्गामध्ये गणला जाईल.
4. राज्य शासनाच्या सेवेत यापूर्वीच असलेल्या उमेदवारांना त्यांनी क्रीडा क्षेत्रात अधिक वरिष्ठ स्थान अथवा पदक प्राप्त केल्यास व ते शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इत्यादी बाबींसह पात्र असल्यास वरिष्ठ जागेसाठी ते अर्ज करण्यास पात्र राहतील.
5. खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच सुधारित तरतुदीनुसार विभागीय उपसंचालक यांच्याकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे.
6. खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षांपर्यंत वयाची अट शिथीलक्षम राहील. तथापि, वयोमर्यादेत ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम असेल.
7. खेळाडू आरक्षणाकरीता सामान्य प्रशासन विभागामार्फत विहित केलेली कार्यपध्दती व निकष वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशानुसार कार्यवाही होईल.
8. आरक्षण हे पदनिहाय व वेतनश्रेणीनिहाय असेल.

www.nmk.co.in

**XI) विशेष सूचना -**

1) बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

2) सेवायोजन कार्यालय प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनीदेखील या जाहिरातीनुसार online अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

3) जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

4) मध्यस्थ/ठग/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहाण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

5) सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. उमेदवाराने वेबसाइट उघडण्यासाठी Internet Explorer 6 अथवा त्या वरील आवृत्तीचाच वापर करावा.

6) ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी असल्यास cecentralrecruitment@mcgm.gov.in हा ई-मेल आयडी दि.11.01.2019 पासून दि.20.01.2019 पर्यंत उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन देण्यासाठी उपलब्ध होईल.

**सही/- 10.01.2019**
**नगर अभियंता**

**नि:समर्थ उमेदवारांसाठी दुय्यम अभियंता (स्थापत्य, यां./ वि., वास्तुशास्त्रज्ञ) पदाची कर्तव्ये, जबाबदारी व त्यासाठी आवश्यक ती शारीरीक क्षमता/पात्रता**

| पदनाम | शारीरीक पात्रता | नि:समर्थत्वाचा प्रकार | कामाचा प्रकार / जबाबदारी |
|---|---|---|---|
| दुय्यम अभियंता (स्थापत्य) | (S)-बसणे,<br>(ST)-उभे रहाणे, (W)-चालणे,<br>(BN)-वाकणे,<br>(MF)-हातांच्या बोटांची हालचाल करणे,<br>(SE)-पहाणे,<br>(RW)-वाचणे व लिहिणे,<br>(H)-ऐकणे, (C)-संवाद साधणे | (OA)-एक हाताने,<br>(OL)-एक पायाने,<br>(BL)-दोन्ही पायाने,<br>(HH)-श्रवण-शक्तीतील दोष | स्थापत्य अभियंता, सर्वसाधारण आराखडे, संघटनात्मक कार्य आणि बांधकामावरील देखरेख, इमारतींची दुरुस्ती, रस्ते, धरणे, पूल, बोगदा, कालवा, विभागातील बहुमजली इमारती, पाईप लाईन टाकणे इ. कामे वास्तुशास्त्रज्ञ किंवा अन्य स्थापत्य अभियांत्रिकीमधील तज्ञ यांच्या मदतीसह वा मदतीशिवाय करणे. संबंधित प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार वास्तुशास्त्रज्ञ यांनी बनविलेल्या योजनेचे नकाशे/ आराखडे तयार करणे, प्राथमिक सर्वेक्षण करण्याकरीता स्थळपहाणी करणे व आवश्यक असलेली मापने, जमिनीच्या मातीची स्थिती, साहित्य व कामगारांची उपलब्धता इ. बाबींची माहिती (स्थापत्य अभियांत्रिकीमधील तज्ञ, अवेक्षक व अंदाजकार यांच्या मदतीसह वा मदतीशिवाय मिळविणे / तयार करणे) योजनेच्या कामाची संकल्पचित्रे, विस्तृत आराखडे व किंमतीचे सविस्तर अंदाजपत्रक अनुरेखकाची मदत घेवून अथवा स्वत: तयार करणे. व संबंधित विभाग वा प्राधिकरणाकडून संमत करुन घेणे. आवश्यक सामुग्री, यंत्रे, कामगार यांची व्यवस्था करणे आणि जागेवर काम चालू करणे. कामाच्या प्रगतीतील प्रत्येक टप्प्यामधील तपशीलाप्रमाणे कामाची योग्य त-हेने अंमलबजावणी होते का याची खात्री करणे, जागेची पहाणी तसेच ओव्हरसीअरने अधिदानाकरीता बनविलेल्या देयकांची तपासणी करणे. विविध कार्यालयातील प्रशासकीय / अभियांत्रिकी कामकाज करणे. |
| दुय्यम अभियंता (विद्युत) | (S)-बसणे, (ST)-उभे रहाणे,<br>(W)-चालणे, (BN)-वाकणे ,<br>(PP)-खेचणे व ढकलणे,<br>(KC)-गुडघे टेकणे व हातपाय दुमडणे,<br>(MF)-हातांच्या बोटांची हालचाल करणे,<br>(SE)-पहाणे,<br>(RW)-वाचणे व लिहिणे,<br>(H)-ऐकणे, (C)-संवाद साधणे | (OL)-एका पायाने,<br>(HH)-श्रवण-शक्तीतील दोष | सर्वसाधारण आराखडे, रुपरेषा, विद्युतयंत्रे, वायरिंग, उपकरणे यांची उभारणी , प्रक्रिया उत्पादन व विद्युत उपकरणाचे परिरक्षण करण्याकरता पर्यवेक्षण करणे, विद्युत कामाची योजना मांडणी तसेच चित्रे तयार करणे, तपासणी करून उचित दुरूस्ती करणे. वायरींग आकृत्या तयार करणे, विद्युत कामाची सर्वकष अंदाज पत्रके तयार करणे, तपासणे, संचमांडणी व उभारणीच्या कामाबाबत तांत्रिक सल्ला देऊन पर्यवेक्षण करणे. झालेल्या कामाची तपासणीकरुन सर्व विद्युत यंत्रणा तांत्रिक तपशील व सुरक्षा लक्षात घेऊन योग्यरित्या कार्यरत आहेत यांची तपासणी करणे. विद्युत उपकरणे दुरुस्ती व देखभाल करण्याकरता सुचित करणे, ट्रान्सफॉर्मर, स्वीचगीअर, साधी विद्युत उपकरणे इ. तसेच विद्युत उर्जा निर्माण व वहन याबाबत विशेष सुधार करण्याबाबत रचना व आराखडे तयार करणे. कमी खर्चाच्या योजना अमलात आणून विद्युत यंत्रणेत सुधारणा करणे.<br>महापालिकेने वेळोवेळी नेमून दिलेली कामे पूर्ण करणे, कामाच्या खर्चाची अंदाजपत्रके, निविदा तयार करणे, प्रशासकीय कामे पार पाडणे. |
| दुय्यम अभियंता (दूरसंचार) | (S)-बसणे,<br>(ST)-उभे रहाणे,<br>(W)-चालणे,<br>(BN)-वाकणे ,<br>(MF)-हातांच्या बोटांची हालचाल करणे,<br>(SE)-पहाणे,<br>(RW)-वाचणे व लिहिणे,<br>(H)-ऐकणे,<br>(C)-संवाद साधणे | (OA)-एका हाताने,<br>(OL)-एका पायाने, | दुय्यम अभियंता (दूरसंचार) यांनी करावयाची सर्वसाधारण कामे रुपरेषा- दूरसंचार यंत्रणेचे आराखडे निर्मात्यांना करणे, स्थापित करणे, तारायंत्र व दूरध्वनी यंत्रणेचे प्रचालन व देखभाल दुरुस्ती करणे, रेडीओ, रडार, विशेष मायक्रोव्हेव, दूरसंचार साधने याबाबत उभारणी करण्याकरता सर्वेक्षण करुन योजना आखून योग्य तपशीलासह रेखाचित्रे तयार करणे. योग्य दूरसंचार यंत्रे जशी - टेलिप्रिंटर्स, सिग्नल यंत्रणा, बिनतारी संदेश, रेडिओ रिसिव्हर यांची उभारणी करणे, ओव्हरहेड अंडरग्राऊंड केबल तारा टाकणे बाबत पर्यवेक्षण करणे, नियतकालिक यंत्रणेची देखभाल करुन तातडीच्या बिघाड दुरुस्त्या करुन टेलिफोन, फॅक्स यंत्रणा कार्यरत राखणे. विशेष उपकरणे देखभाल करणेसाठी विशेष सर्वसाधारण रचना करुन टेलिफोन, तारयंत्रे, टेलिप्रिंटर, रेडिओ यंत्रणा अद्ययावत करणे.<br>महापालिकेने वेळोवेळी नेमून दिलेली कामे पूर्ण करणे, कामाच्या खर्चाची अंदाजपत्रके, निविदा तयार करणे, प्रशासकीय कामे पार पाडणे. |

www.nmk.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| दुय्यम अभियंता यांत्रिकी | (S)-बसणे,<br>(ST)-उभे रहाणे,<br>(W)-चालणे,<br>(BN)-वाकणे ,<br>(KC)-गुडघे टेकणे व हातपाय दुमडणे,<br>(MF)-हातांच्या बोटांची हालचाल करणे,<br>(SE)-पहाणे,<br>(RW)-वाचणे व लिहिणे,<br>(H)-ऐकणे,<br>(C)-संवाद साधणे | (OA)-एक हाताने,<br>(OL)-एक पायाने,<br>(HH)-श्रवण-शक्तीतील दोष | सर्वसाधारण आराखडे (नकाशे), रुपरेषा आणि उभारणी, प्रक्रीया, उत्पादन व यंत्र व उपकरणे यांचे परिरक्षण करण्याकरीता पर्यवेक्षण करणे. बांधकामाचे दर्शविलेले तपशीलानुसार जागेचे नकाशे रुपरेषा तयार करणे आणि प्रत्यक्ष यंत्रे / उपकरणे यांची उभारणी, देखभाल व दुरूस्तीची कामे करणे. कार्यरत असलेल्या यंत्राच्या कार्यतत्परतेबाबत अभ्यास करणे. कार्यक्षमता वाढविण्याकरीता सुधारणा सुचविणे, उत्पादनाच्या तांत्रिक बाजूचे पर्यवेक्षण करणे, योग्य दर्जाच्या खात्रीकरीता कारखान्यातील वेगवेगळया टप्प्यांवरील उत्पादनाची तपासणी करणे. गती व वेळ यांचा अभ्यास करणे व कार्यक्षमतेचा विचार करणे, उत्पादनाच्या आर्थिक बाबींचा विचार करणे. कार्यक्षम प्रक्रियेकरीता कारखान्यातील टूल्स, उपकरणे/ विविध भाग यांची दुरुस्ती व परिरक्षण करणे. कारखाना कायदे, वैधानिक तरतूदींच्या बाबत सुरक्षितता सुधारणा आणि निरीक्षणाबाबत खात्री करणे. तपशीलानुसार बाहेर दिलेल्या, आत आलेल्या वस्तू भंडाराची तपासणी करणे, मागणीपत्र तपासणे.<br>सी.सी.टि.व्ही., लॅन कनेक्टिवीटी, दूरध्वनी यंत्रणा, सौरउर्जा, वातानुकूलीत यंत्रे या कामाबाबतची अंदाजपत्रके तयार करणे, निवीदा तयार करणे. विद्युत वाहीनीतील विद्युत कामे, पंप दुरुस्ती व देखभाल इ. कामे अधिनस्त कर्मचा-यांकडून पार पाडणे. तसेच, प्रशासकीय कामे पार पाडणे. |
| दुय्यम अभियंता इलेक्ट्रॉनिक्स | (S)-बसणे, (ST)-उभे रहाणे,<br>(W)-चालणे, (BN)-वाकणे ,<br>(KC)-गुडघे टेकणे व हातपाय दुमडणे,<br>(MF)-हातांच्या बोटांची हालचाल करणे,<br>(SE)-पहाणे,<br>(RW)-वाचणे व लिहिणे,<br>(H)-ऐकणे, (C)-संवाद साधणे | (OA)-एक हाताने,<br>(OL)- एक पायाने,<br>(BL)-दोन्ही पायाने,<br>(HH)-श्रवण-शक्तीतील दोष | इलेक्ट्रॉनिक्स अभियंता इलेक्ट्रॉनिक उपकरणे तपासणी किंवा चाचणी करण्यात निष्णांत / तज्ञ इलेक्ट्रॉनिक्स अभियंतांना धरून संशोधन कार्य पार पाडणे, इतरत्र वर्गीकरण नसलेल्या इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी मधील समस्यांकरीता तांत्रिक सल्ला देणे. तसेच, प्रशासकीय कामे पार पाडणे. |
| दुय्यम अभियंता वास्तुशास्त्रज्ञ | S (बसणे), W(चालणे), RW(वाचणे व लिहिणे), MF(बोटांची हालचाल करणे), SE(बघणे), C(संवाद साधणे), H (ऐकणे), ST (उभे राहणे) | OL - चलनवलन विषयक विकलांगता HH - श्रवण शक्तीतील दोष | नव्याने बांधावयाच्या इमारती, स्मारके इत्यादीचे आराखडे व बांधकामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे. तसेच अंमलबजावणीच्या दृष्टीने विशिष्ट कार्यासंबंधीचा आणि संस्थात्मक तपशील मिळविण्यासाठी समन्वय साधणे. नव्याने बांधावयाच्या इमारतींच्या आवश्यकता व प्रकार यानुसार आवश्यक माहिती संकलित करणे. उपलब्ध निधी, इच्छित विशिष्ट वैशिष्ठये यानुसार स्वत: आराखडे बनविणे किंवा वास्तुशास्त्रीय आरेखकांकडून विनिर्दिष्ट प्रमाणानुसार इमारतीचे सदर जागेवरील स्थान, आराखडा बनवून घेणे व सक्षम अधिका-यांच्या मान्यतेकरिता सादर करणे. वास्तुशास्त्रीय वैशिष्टये व फरसबंदी इत्यादीचे तपशील बनविणे. लागणा-या साधनसामुग्रीचे अंदाजपत्रक व इतर तपशील यांची माहिती आराखड्यांमध्ये दर्शविणे. जेणेकरुन आराखड्यानुसार कामाची अंमलबजावणी होईल. आवश्यकता असल्यास वेळोवेळी बांधकामाच्या जागेला भेट देणे, पर्यवेक्षण करणे व मार्गदर्शन करणे. आवश्यक ठिकाणी अभियंता व तज्ञांचा सल्ला घेऊन त्यानुसार विद्युत जोडणी, स्वच्छतागृहे, बागकाम इत्यादी कामे करुन घेणे. पूर्ण झालेल्या बांधकामाचे अधिदान मंजूर करणे. |

**सही/- 10.01.2019**
**नगर अभियंता**

www.nmk.co.in

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

प्रपत्र – 1

नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्तीसाठी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज.

प्रेषक -
नाव -
पत्ता -

दिनांक -   /   /

प्रति,
नगर अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालय,
5 वा मजला,विस्तारीत इमारत,
फोर्ट, मुंबई – 400 001.

विषय - नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्तींना परीक्षेच्या वेळी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी उपलब्ध करून देण्याबाबत.

महोदय,

1. मी नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवार असून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दि.   .   .२०   रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून बृहन्मुंबई महानगरपालिकेस अर्ज सादर केला आहे. सदर परीक्षेच्या उमेदवारी संदर्भातील माझी माहिती खालीलप्रमाणे आहे. -

1) परीक्षेचे नाव- ..............................................................................
2) परीक्षेचा प्रस्ताविक दिनांक - .............................
3) नोंदणी क्रमांक - ............................................................................
4) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांक - ..............................
5) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडील नोंदणीकृत ई - मेल आयडी - ........................................

2. मी चलनवलन विकलांगता (हाताने लिहू शकत नसेल तर) नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्ती असून परीक्षेच्यावेळी स्वत: उत्तरे लिहण्यासाठी मी सक्षम नाही. नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील शासनाच्या तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियम / सूचनेनुसार मला लेखनिकाची / अनुग्रह कालावधीची (लागू नसेल ते खोडावे) आवश्यकता आहे.

3. विहित नि:समर्थतेबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

4. नि:समर्थत्वामुळे स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याने/उत्तरे लिहिण्याच्या वेगावर मर्यादा येत असल्यामुळे, परीक्षेच्यावेळी लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्साबाबत/नियमानुसार अनुग्रह कालावधी आवश्यक असल्याबाबत (लागू नसेल ते खोडावे) सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

★5. प्रस्तुत परीक्षेकरीता लेखनिकाची व्यवस्था मी स्वत: करणार असून लेखनिक म्हणून मी निवडलेल्या व्यक्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे -

5.1 लेखनिकाचे नाव - ..............................................................................
5.2 लेखनिकाचा जन्मदिनांक - ......................................................................
5.3 लेखनिकाचा कायम रहिवासाचा पत्ता - .........................................................
..............................................................
5.4 लेखनिकाचा ओळखपत्र क्र.- .....................................................................
5.5 लेखनिकाचा आधार क्र. - ...................................... (आधार कार्ड, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट यापैकी एक)
5.6 मोबाईल नंबर - 1) उमेदवार - .............................
2) लेखनिक - ..........................
5.7 लेखनिकाची शैक्षणिक अर्हता - .................................................................
टिप: लेखनिकाची अर्हता ही सदर पदाच्या अर्हतेपेक्षा निम्न संवर्गातील पदाची असणे आवश्यक आहे.
5.8 उमेदवाराचे लेखनिकाशी नाते (असल्यास) - ..............................................
5.9 लेखनिकाची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कोणत्याही पदावर निवड झाली आहे का ?
होय / नाही

www.nmk.co.in

5.10 लेखनिकाची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निवड झाली असल्यास -

1. परीक्षेचे नाव -
2. बैठक क्रमांक -
3. शिफारस झालेले पद -

5.11 लेखनिकाने यापूर्वी एखाद्या उमेदवाराला लेखनिक म्हणून मदत केली असल्यास -

1. उमेदवाराचे नाव -
2. परीक्षेचे नाव -
3. उमेदवाराचा बैठक क्रमांक -

6. नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या इतर सर्व सूचना वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत हमी देतो.

7. लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह वेळ घेण्याबाबत विहित निकषाची उमेदवाराकडून पुर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वत: बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराची तसेच लेखनिकाची संबंधित परीक्षेची उमेदवारी रद्द करून उमेदवारास व लेखनिकास बृहनमुंबई महानगरपालिकेच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल, अथवा इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकरणी संबंधितांची शासन सेवेतील पदावर नियुक्ती झाली असेल तर त्याची सेवा समाप्ती योग्य ठरेल, याची आम्हास जाणीव आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी .................................. लेखनिकाची स्वाक्षरी ..............................

दिनांक .................................. दिनांक ..............................

★ लागू नसेल ते खोडावे

सोबत-

1) नि:समर्थतेबाबत विहित वैद्यकीय प्रमाणपत्र
2) लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत/नियमानुसार अनुग्रह कालावधी आवश्यक असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले वैध प्रमाणपत्र.
3) लेखनिकाच्या आधारकार्डची/ओळखपत्राची उमेदवाराने व लेखनिकाने स्वसाक्षांकित केलेली प्रत.

www.nmk.co.in

प्रपत्र-२

**Certificate of Disability in Dominant (Writting) Extremity**

**(In case of Utilizing Services of scribe and / or Compensatory time)**

**NAME OF THE HOSPITAL**________________________________________________

| |
|---|
| Recent PP size attested photograph (Showing face only) of the person with disability |

Certificate No. ________________ Date _______________

This is to certify that we have carefully examined

Shri/Smt./Kum. ______________________________________________________ son / wife / daughter of Shri. _______________________________________________

Date of Birth (DD / MM/ YY) __ __ ____ Age ______ years, male / female ________________________

Registration No. _______________ Address ____________________________________________________

Village/City ________________ Taluka _________________ District _________________ whose photograph is affixed above, and satisfied that:

(1) He / She is person with disabilities suffering from:

**Locomotor Disability / Cerebral Palsy**

(2) In the light of above his/her overall permanent physical impairment/disability is ______ percent (in word ______ percent) in relation to his/her __________________ (Part of Body) as per guidelines (To be specified)

(3) It is to certify that he/she is having disability due to which his/her **writing speed is affected permanently** and he/she needs a writer (Scribe) as permissible under Government of India rules governing the recruitment of Physically Challenged Persons.

#(4) It is to certify that he/she may be allowed writer (Scribe) during the course of examination.

#(5) It is to certify that he/she may be given Compensatory time of 20 minutes for every hour of examination.

2. The applicant has submitted the following document as proof of residence:-

| Nature of Document | Date of Issue | Details of authority issuing certificate |
|---|---|---|
| | | |

(Signature and Seal of the Medical Authority)

www.nmk.co.in

Dr.____________________ Dr.____________________ Dr.__________________

President Member Secretary Concerned Specialist

Signature / Thumb impression of the person in whose favour disability certificate is issued ________________

# Strike out whichever is not applicable

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

विवरणपत्र – 3

(लेखनिकाची मदत घेणा-या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाची संयुक्त प्रमाणपत्र)

1. परीक्षेचे नाव – ....................................
2. दिनांक – ..........................................
3. वेळ – ..............................................
4. विषय – ...........................................
5. केंद्र– ..............................................
6. उपकेंद्राचे नाव– ...................................

| लेखनिकाचा पासपोर्ट आकाराचा फोटो या ठिकाणी चिटकावा |
|---|

**उमेदवार व लेखनिकाची माहिती –**

1. उमेदवाराचे नाव – ...........................................................................
2. उमेदवाराचा बैठक क्रमांक – ..................................................................
3. लेखनिकाचे नाव – ...........................................................................
4. लेखनिकाचा जन्मदिनांक – ....................................................................
5. लेखनिकाचा कायम रहिवासाचा पत्ता – ........................................................
   ..................................................................
6. लेखनिकाचा ओळखपत्र क्रमांक – ..............................................................
   (आधार कार्ड, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट यापैकी एक)
7. लेखनिकाचा आधार क्रमांक – ..................................................................
   ( लेखनिकाच्या आधार कार्डची मूळ प्रत दाखविणे व स्वसाक्षांकित प्रत समवेक्षकांना देणे आवश्यक आहे.)
8. मोबाईल क्रमांक – (अ) उमेदवार – .............................. (ब) लेखनिक – ..........................
9. लेखनिकाची शैक्षणिक अर्हता – ...................................................................
10. उमेदवाराचे लेखनिकाशी नाते (असल्यास) – ......................................................

**– प्रमाणपत्र –**

आम्ही निम्नस्वाक्षरीकार श्री./श्रीमती/कुमार/कुमारी ................................................ (उमेदवाराचे नाव) या परीक्षेकरीता पात्र उमेदवार व श्री./श्रीमती/कुमार/कुमारी ................................................ (लेखनिकाचे नाव) पात्र उमेदवाराचा लेखनिक, खालीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र करतो की,

1. आमच्या माहिती व समजुतीप्रमाणे वरील माहिती सत्य व बिनचूक आहे. नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेनी दिलेल्या इतर सर्व सूचना आम्ही वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत हमी देतो.

2. नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील शासनाच्या तसेच आयोगाच्या नियम/सुचनानुसार **उमेदवाराला लेखनिकाची आवश्यकता आहे.**

3. विहित नि:समर्थत्वाबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले वैध प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असून ते कोणत्याही टप्प्यावरील चौकशीच्या वेळी सादर करण्यात येईल.

4. नि:समर्थत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याने उत्तरे लिहिण्याच्या वेगावर मर्यादा येत असल्यामुळे परीक्षेच्या वेळी लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत निवड प्रक्रिया अथवा मुलाखत अथवा निवडीनंतर कामावर रूजू होताना अथवा अन्य कोणत्याही टप्प्यावर सक्षम प्राधिका-याने नियुक्त केलेल्या वैद्यकीय मंडळाची खात्री पटविण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

5. लेखनिकाची मदत घेणारा उमेदवार नियमानुसार प्रत्येक तासाला 20 मिनिटाचा अनुग्रह (Compensatory) वेळेसाठी पात्र आहे, याची आम्हाला जाणीव आहे.

www.mnk.co.in

६. उमेदवाराने लेखनिक नेमला असल्यास त्यास दुस-या उमेदवाराला अन्य परीक्षेत लेखनिक म्हणून काम करता येणार नाही, याची आम्हाला जाणीव आहे.

७. उमेदवार व लेखनिक एकाच परीक्षेकरिता उमेदवार नाहीत.

८. लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह वेळ घेण्याबाबत विहित निकषाची उमेदवारांकडून पुर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वत: बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराची तसेच लेखनिकाची संबंधित परीक्षेची उमेदवारी रद्द करून उमेदवारास व लेखनिकास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल, अथवा इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकरणी संबंधितांची महानगरपालिकेच्या सेवेतील पदावर नियुक्ती झाली असेल तर त्याची सेवा समाप्ती योग्य ठरेल.

उमेदवाराची स्वाक्षरी ....................................    लेखनिकाची स्वाक्षरी .....................................

दिनांक ....................................    दिनांक ......................................

(पर्यवेक्षक / समवेक्षक यांच्या उपस्थितीत दोघांनी स्वाक्षरी करणे आवश्यक)

समवेक्षकाची स्वाक्षरी ....................................    पर्यवेक्षकाची स्वाक्षरी .....................................

www.nmk.co.in

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

विवरणपत्र – 4

अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) मागणी करणा-या उमेदवाराने द्यावयाचे प्रमाणपत्र

1. परीक्षेचे नाव – ..........................................................................................

2. दिनांक – ...............................

3. वेळ – ...............................

4. विषय – ..........................................................................................

5. केंद्र – ..........................................................................................

6. उपकेंद्राचे नाव – ..........................................................................................

**उमेदवाराची माहिती –**

1. उमेदवाराचे नाव – ..........................................................................................

2. उमेदवाराचे बैठक क्रमांक– ........................................

3. मोबाईल क्रमांक – ........................................

**– प्रमाणपत्र –**

मी श्री. /श्रीमती/कुमार/कुमारी ...................................................... (उमेदवाराचे नाव) या परीक्षेकरीता पात्र उमेदवार खालीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र करतो की,

1. माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे वरील माहिती सत्य व बिनचूक आहे. नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांना अनुग्रह कालावधी (Compensatory Time) पुरविण्यासंदर्भातील तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या इतर सर्व सूचना मी वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत हमी देतो.

2. विहित नि:समर्थत्वाबाबत सक्षम प्रधिका-याने प्रदान केलेले वैध प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असून ते कोणत्याही टप्प्यावरील चौकशीच्या वेळी सादर करण्यात येईल.

3. नि:समर्थत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याने उत्तरे लिहिण्याच्या वेगावर मर्यादा येत असल्यामुळे परीक्षेच्या वेळी अनुग्रह कालावधी आवश्यक असल्याबाबत निवड प्रक्रीया अथवा निवडीनंतर कामावर रूजू होताना अथवा अन्य कोणत्याही टप्प्यावर सक्षम प्राधिका-याने नियुक्त केलेल्या वैद्यकीय मंडळाची खात्री पटविण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

4. उमेदवार नियमानुसार प्रत्येक तासाला 20 मिनिटाचा अनुग्रह वेळेसाठी (Compensatory Time) पात्र आहे, याची मला जाणीव आहे.

5. अनुग्रह वेळ घेण्याबाबत विहित निकषाची उमेदवारांकडून पुर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वत: बद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास परीक्षेची उमेदवारी रद्द करून उमेदवारास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वेच्छाधिकारानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आयोजित केल्या जाणा-या परीक्षांमधून प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल. अथवा इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकरणी उमेदवाराची महानगरपालिका सेवेतील पदावर नियुक्ती झाली असेल तर त्याची समाप्ती योग्य ठरेल, याची मला जाणीव आहे.

उमदेवाराची स्वाक्षरी – ..................................

दिनांक – ..................................

(पर्यवेक्षक / समवेक्षक यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करणे आवश्यक)

समवेक्षकाची स्वाक्षरी ....................................     पर्यवेक्षकारी स्वाक्षरी ...............................

www.nmk.co.in